Impact Factor-8.632 (SJIF)
ISSN-2278-9308

# B.Aadhar


Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**February - 2024**

**(CDLVII) 457 (A)**

## ग्रामीण समाज : समस्या आणि आव्हाने



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social**
**Research & Development**
**Training Institute Amravati**

**Editor**
**Dr. Nandkishor U. Raut**
**Officiating Principal**
**Shriram Kala Mahila Mahavidyalaya,**
**Dhamangaon Rly, Dist. Amravati**

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | परंपरागत महिलावरील वाढते अत्याचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री मुक्तीचे विचार व कार्य डॉ. बी. एम. कऱ्हाडे | 1 |
| 2 | ग्रामीण समाज : समस्या आणि आव्हाने डॉ. नंदकिशोर उकंडराव राऊत | 11 |
| 3 | पोटगी कायद्याचे समाजशास्त्रिय अध्ययन डॉ. रविंद्र विठोबा विखार | 17 |
| 4 | विदर्भातील शेतकरी आत्महत्या डॉ किशोर उत्तमराव राऊत | 21 |
| 5 | शेतकरी आत्महत्या– एक समाजशास्त्रीय अध्ययन डॉ. संजय बबनराव चौधरी | 25 |
| 6 | शेतकरी व शेतमजुर यांच्या समस्या व समाजशास्त्रज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकरांची प्रासंगितता प्रा. डॉ दिवाकर एच. उराडे | 28 |
| 7 | ग्रामीण स्त्रियांच्या मुलभूत समस्या आणि उपाययोजना डॉ. अमरीष गावंडे | 33 |
| 8 | भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या—एक अध्ययन प्रा. आशिष रमेश बोरकर , प्रा. डॉ.रवींद्र विठोबा विखार | 37 |
| 9 | ग्रामीण बेरोजगारी कु. गोदावरी विठ्ठलबन बन | 42 |
| 10 | भारतीय शेतमजुरांच्या समस्या प्रा.डॉ.भिमराव पूर.उबाळे | 49 |
| 11 | कृषी क्षेत्राच्या समस्या प्रसेनजित वसंतराव गजभिये | 54 |
| 12 | शेतकरी आत्महत्येचे समाजशास्त्रीय अध्ययन डॉ.पुरूषोत्तम रा.बांडे | 59 |
| 13 | आदिवासी समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुला—मुलींच्या जीवनात झालेले परिवर्तन डॉ. देवेंद्र सोनटक्के , डॉ. नंदकिशोर एस.भगत | 63 |
| 14 | विदर्भाच्या ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतीची स्थिती डॉ.दयानंद उत्तमराव राऊत | 68 |
| 15 | पारधी जमातीच्या आरोग्यविषयक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ—वाशिम जिल्हा) प्रविण चंद्रसुभाष जांभरुणकर , डॉ. दीपक राघोजी दामोदर | 72 |
| 16 | ग्रामीण विकास आणि आव्हाने एक विश्लेषण डॉ. एच. यू. पेटकर | 75 |
| 17 | जागतिकीकरणाचा ग्रामीण जीवनावरील परिणाम डॉ. नितीन रमेश भिंगारे | 79 |
| 18 | शेती व शेतकर्यांच्या विकासातील आव्हानांची कारणमिमांसा: एक समाजशास्त्रीय विश्लेषण प्रा. डॉ. सीमा विठ्ठलराव शेटे | 82 |
| 19 | शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबासाठी सरकारी पॅकेजच्या उपयोगीतेचे समाजशास्त्रीय अध्ययन प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ | 87 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLVII) 457-A
ISSN : 2278-9308
February 2024

# ग्रामीण समाज : समस्या आणि आव्हाने

डॉ. नंदकिशोर उकंडराव राऊत
समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे, जि. अमरावती.

**प्रस्तावना :**

मानव हा समाजशील प्राणी असून त्यासोबतच तो जिज्ञासू आणि प्रयत्नशील प्राणी देखील आहे. पृथ्वीतलावर अवतरल्यापासून त्याची जीवनावश्यक गरजा भागवण्यासाठी सतत धडपड सुरू आहे. स्वतःचे जीवन आहे त्यापेक्षा अधिक सुखकर कसे करता येईल? यासाठी त्याचा सातत्याने झगडा सुरू आहे. जोपर्यंत त्याला ठोस आणि मूलभूत अशी उदरनिर्वाहाची साधने उपलब्ध नव्हती तोपर्यंत तो सतत भटकत होता. त्याने निश्चित अशी उदरनिर्वाहाची साधने शोधून काढली. त्यानंतर त्याच्या जगण्याला एक प्रकारचे स्थैर्य प्राप्त झाले. आद्य पाषाण युगात निसर्गातील खाद्य वस्तूंचा संग्रह करून मानव उदरनिर्वाह करीत होता. नंतरच्या नवपाषाण युगात तो पशुपालन आणि वनस्पतींची लागवड करू लागला. त्यानंतर धातू युगांमध्ये अनेक उद्योगधंदे अस्तित्वात आले. त्यामुळे मानवाची सततची भटकंती थांबली आणि तो स्थिर वस्ती करून राहू लागला. त्याच्या स्थिर जगण्यामुळे खेडी अस्तित्वात आली. मानव उदरनिर्वाहासाठी शेती करू लागला. स्थिर समाज आणि शेती व्यवसाय याचे निदर्शक म्हणजे खेडे. शेतीतून मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्याची पद्धती मानवाने अवगत केली. सुरुवातीला केवळ पोटापुरते उत्पन्न घेणारा मानव मोठ्या प्रमाणात शेतीमाल उत्पादित करू लागला. त्याला मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठा विकसित कराव्या लागल्या. तसेच त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग देखील उभारावे लागले. नवनवीन यंत्र तंत्राचे शोध लावले. त्यातून मोठ्या आकाराची खेडी (शहरे) उदयास आली. आणि मानवी समाजाचे ग्रामीण व नागरी असा भेद करण्यास सुरुवात झाली. विकासाच्या प्रक्रियेने वेग धारण केल्यानंतर या प्रक्रियेमध्ये नागरी समाजाच्या तुलनेत ग्रामीण समाज अनेक बाबतीत पिछाडीवर राहिला. त्यामुळे अनेक समस्या आणि आव्हाने या समाजापुढे उभी ठाकली. आज जगभरात मानवी समाजाचे आदिवासी, ग्रामीण आणि नागरी समाज असे वर्गीकरण केले जाते. भारत हा कृषिप्रधान देश असून आजही ६८% लोकसंख्या शेती आणि शेतीशी निगडित असणाऱ्या इतर व्यवसायाशी संबंधित आहे. आजही देशातील ६५% लोकांचे ग्रामीण भागात वास्तव्य आहे. शहरातील देखील अनेक लोक शेती करतात. आदिवासी, ग्रामीण आणि नागरी समाजापासून अलिप्त असले तरी स्थिर आणि काही प्रमाणात फिरती शेती करतात. यावरून भारतात शेती करणाऱ्यांची म्हणजेच ग्रामीण समुदायाची संख्या बरीच मोठी आहे. म्हणून शेती व्यवसायाशी निगडित अशा ग्रामीण समाजासमोरील समकालीन समस्या आणि आव्हाने काय आहेत? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने या शोधनिबंधाचे प्रयोजन आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) ग्रामीण समाजाची व्याख्या समजून घेणे
२) समस्या व आव्हानांचा अर्थ स्पष्ट करणे
३) ग्रामीण समाजासमोरील सांप्रत काळातील काही समस्या आणि आव्हानांचा आढावा घेणे.
४) ग्रामीण समाजाचे वास्तविक जीवन समाजापुढे मांडणे

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतांच्या आधारे जसे ग्रंथ, वृत्तपत्र, बातम्या, संशोधन अहवाल इत्यादींचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच निरीक्षण व अवलोकनाच्या आधारे अध्ययन करण्यात आले आहे.

**वीज शब्द :** ग्रामीण समाज, समस्या, आव्हाने, शेती, शेतकरी, शेतमजूर

**ग्रामीण समाज म्हणजे काय?**

त्रिं. ना. अत्रे यांनी आपल्या गावगाडा या पुस्तकात, "खंडणे किंवा खेडणे म्हणजे जमीन कसणे आणि जमीन कसणारा म्हणजे खेडूत. तेव्हा खेडूतांची वस्ती म्हणजे खेडे, ज्याचा प्रधान धंदा शेती असतो." अशा वस्तीला गाव असे म्हटले जाते. अशी खेड्याची व्याख्या केली आहे. सिम्स यांच्यामते, "खेडे हे असे नाव आहे की, जे प्राचीन कृषकांच्या

स्थापनेस दर्शविते." यावरून मानवाने गावात स्थायी रूपाने निवास करण्याचे एकमेव कारण म्हणजे शेती व्यवसाय होय. कृषी किंवा शेतीसाठी मानवी समाज एका निश्चित ठिकाणी वास्तव्य करू लागला. कृषी मुळे मानवाने गाव वसविले. म्हणून कृषी हे खेड्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आदिवासी, ग्रामीण आणि नागरी अशा तीनही समाजात शेती करणारे लोक आढळतात. हे तीनही समाज आज परस्पर संबंधित आणि परस्परावलंबी आहेत. ग्रामीण समाजाची संख्या मोठी असून या समाजाला आज विविध समस्या आणि आव्हानांचा सामना करावा लागत आहे. या समाजातील समस्या आणि आव्हानांचा विचार करताना प्रामुख्याने शेतकरी आणि शेतमजूर यांच्या संदर्भात विचार करावा लागतो.

**समस्या व आव्हाने या संज्ञांचा अर्थ :**

अल्पविकसित, विकसनशील किंवा विकसित अशा सर्व गटातील देशांमध्ये समस्या आणि आव्हाने आहेत. भारतीय ग्रामीण समाज हा अभावग्रस्त जीवन जगत आहे त्यामुळे या समाजासमोर अनेक समस्या आणि आव्हाने उभी आहेत. या दोन्ही संज्ञा सर्वसामान्य व्यवहारात एकाच अर्थाने वापरल्या जातात. म्हणून या दोन्ही संज्ञांचा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे.

समस्या :समाजशास्त्रामध्ये सामाजिक समस्या ह्या समाजोद्भवित असतात असे मानले जाते. एखाद्या प्रश्नाचे निराकरण करणे हे मानवी आवाक्यातले काम आहे. तो दैविकोप, ईश्वरी अवकृपा, नशीव किंवा गतजन्मीच्या कर्माचा भाग आहे असे समाजशास्त्रात समजले जात नाही. योग्य प्रकारे आणि चिकाटीने प्रयत्न केले तर कोणत्याही प्रश्नाचे निराकरण शक्य आहे. असा अर्थभाव समस्या या शब्दातून व्यक्त होतो."सामूहिक पातळीवरील उपाय योजनेतून सामाजिक समस्येचे निराकरण होऊ शकते असे समाजशास्त्रात मानले जाते."

आव्हान :इंग्रजी भाषेतील issue या शब्दासाठी मराठी भाषेमध्ये आव्हान हा शब्द वापरला जातो. Issue आणि problem या दोन्ही शब्दांना स्वतंत्र अर्थभाव आहे.Issue या शब्दातून 'एकमत किंवा सहमत होण्यास अत्यंत अवघड असणारा विषय किंवा प्रश्न' असा अर्थभाव व्यक्त होतो. आव्हानांच्या निराकारणावावत कोणताही निर्णय घेतला तरी मतभिन्नता व्यक्त होणे सुरूच असते. म्हणून एखाद्या विषयावावत त्याच्या निराकरणासाठी लोकांमध्ये मतैक्य न होणे अशा विषयाला आव्हान असे म्हणता येते.

ग्रामीण समाजातील काही समस्या आणि आव्हाने पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) कर्जबाजारीपणा :-कोरडवाहूशेतीतून प्राप्त होणाऱ्या अल्प उत्पन्नामुळे शेतकऱ्याला शेती करण्यासाठी सतत कर्ज घ्यावे लागते. शेती पिकवून प्राप्त होणारे उत्पन्न हे अल्प असल्यामुळे वर्षभर उदरनिर्वाह करणे त्याला कठीण असते. सरकार किंवा बँकेकडून कर्ज घेताना शेतकऱ्याला मोठ्या प्रक्रियेचा सामना करावा लागतो. विविध प्रकारची कागदपत्रे द्यावी लागतात. माहितीचा अभाव असल्यामुळे आणि अज्ञानामुळे बरेच शेतकरी या बँकांकडून कर्ज घेण्याचे टाळतात. आणि अगदी सोप्या पद्धतीने सावकाराकडून कर्ज प्राप्त करतात. सावकारी कर्जाचा व्याजाचा दर जास्त असतो. शेतीला लावण्यासाठी सावकाराकडून कर्ज घेणे आणि उत्पादन आल्यानंतर व्याजासकट तोच पैसा सावकाराला परत करणे. परंतु शेती कमी पिकल्यामुळे, कधी कधी नापिकी झाल्यामूळे कर्ज आणि व्याजाची परतफेड करता येत नाही. परिणामी शेतकरी कर्जबाजारी होतो.

२) बेरोजगारी :-औद्योगिक क्रांतीच्या आधी शेती हाच लोकांचा मुख्य व्यवसाय होता. जेव्हा अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात शेतीवर अवलंबून होती तेव्हा लोकांच्या गरजा मर्यादित होत्या आणि लोकसंख्या देखील मर्यादित होती. कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत बेरोजगारीची समस्या नव्हती. परंतु आज अविकसित, विकासशील आणि विकसित अशा सर्वच राष्ट्रांमध्ये बेरोजगारी निर्माण झाली आहे. बेरोजगारीची समस्या ही प्रामुख्याने गरिबी आणि काम उपलब्ध नसलेल्या स्थितीशी निगडित आहे. गुन्नार मिर्डाल यांच्या मते, "बेरोजगारी ही ऐच्छिक नसून अनैच्छिक आहे." काम करण्याची क्षमता व इच्छा असूनही त्यांना रोजगार मिळत नाही अशा व्यक्तींनाच बेरोजगाराचे म्हटले जाते. देशामध्ये उपलब्ध असलेल्या कामापेक्षा काम करण्याची क्षमता व इच्छा असणारी माणसे जास्त असल्यामुळे जर अनेक लोकांना कामा वाचून राहावे लागत असेल तर त्या अवस्थेला बेरोजगारी असे म्हणतात. भारताच्या ग्रामीण समाजात शेती हाच एकमेव रोजगाराचा स्रोत आहे. रोजगाराच्या इतर संधींची उपलब्धता फार कमी आहे. त्यामुळे अनेक लोकांना कामा वाचून राहावे लागते. शेतीचे तुकडीकरण झाल्यामुळे ग्रामीण समाजात सुप्त बेरोजगारी आढळून येते. पूर्वी वीस वीस एकर शेती चार-सहा लोक कसायचे आज शेतीचे दोन-चार एकराचे तुकडे झाले असले तरी तितकेच लोक शेतीमध्ये काम करतात. शेतीचा आकार लहान झाला परंतु काम करणाऱ्यांची संख्या होती तितकीच आहे. लोकसंख्या वाढली

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLVII) 457-A
ISSN : 2278-9308
February 2024

असली तरी शेती वाढवता येत नाही उपलब्ध शेतीवर जास्त लोकांना अवलंबून राहावे लागते. कृषी क्षेत्रात फक्त हंगामातच रोजगार मिळतो. शेतीचा विकास न झाल्यामुळे लोकांना वर्षभर रोजगार मिळत नाही.

**३) स्थलांतर :-**स्वतःचे मूळ निवासस्थान किंवा गाव सोडून इतरत्र राहावयास जाणे असा स्थलांतर या संज्ञेचा अर्थ आहे. स्थलांतराची व्याख्या करताना राजकीय सीमा या संज्ञेचा आधार घ्यावा लागतो. समाजशास्त्री दृष्टीने स्थलांतर ही एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. कारण या प्रक्रियेमुळेग्रामीण आणि नागरी अशा दोन्ही समाजामध्ये परिवर्तन घडवून येते. स्थलांतराच्या विविध प्रकारांपैकी ग्रामीण ते नागरी स्थलांतराचे प्रमाण फार मोठे आहे. खेड्यामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारा शेती हा एकमेव व्यवसाय आहे. त्यामध्ये बारोमास रोजगार प्राप्त होत नाही. उलट शहरांमध्ये रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध असतात. म्हणून ग्रामीण लोक शहरांकडे आकर्षित होतात. गावातील लोकांनी शहरांमध्ये स्थलांतर केल्यामुळे गावात शेतीसाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ प्राप्त होत नाही. परिणामी शेती उत्पन्नात घट होते. दुसरीकडे शहरांमध्ये स्थलांतरित झाल्यामुळे शहरात देखील नागरी सुविधांवर भार पडतो.

**४) शेतकरी आत्महत्या :-** सर्वप्रथम एमीळ दुर्खीम या समाजशास्त्रज्ञाने आत्महत्या ही एक सामाजिक तथ्य आहे असे मानले. आणि त्याला समाजशास्त्रीय अध्ययनाचा एक विषय मानले आहे. ग्रामीण भागात सांप्रत काळात शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरू आहे. १९ मार्च १९८६ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण या गावातील साहेबराव करपे यांनी पत्नी आणि स्वतःच्या चार मुलांसह वर्धा येथील कुष्ठधामात आत्महत्या केली. ही देशातली सगळ्यात पहिली शेतकरी आत्महत्या होय. महाराष्ट्रात ०१ जानेवारी २००१ पासून ३१ मे २०२३ पर्यंत ४१ हजार ८५९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी २०२३ च्या सुरुवातीच्या जानेवारी ते मे २०२३ या पाच महिन्यांमध्ये १०६१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. महाराष्ट्रात दररोज सरासरी ०७ शेतकरी आत्महत्या होतात. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. आर्थिक उत्पन्न कमी आहे. शेती करण्यासाठी शेतकरी सावकारी कर्ज घेतात. पीक आल्यानंतर कर्ज फेडू असे त्यांना वाटते. परंतु निसर्गावर अवलंबून असणाऱ्या शेतीतून चांगले पीक न आल्यामुळे शेतकरी कर्ज फेडू शकत नाही. म्हणून ते कर्जबाजारी होतात. शेतकरी अतिशय परिश्रम करून शेतीची मशागत करतात. पैसा खर्च करून लागवड करतात. तरीदेखील शेतीत नापिकी होऊन फार मोठे नुकसान त्याच्या वाट्याला येते. तेव्हा नैराश्य निर्माण होऊन ते आत्महत्येकडे वळतात.कर्जबाजारीपणा, शेतीच्या लागवड खर्चात वाढ, नापिकी, पिकांचे नुकसान, व्यसनाधीनता, सिंचनाच्या सोयींचा अभाव, व्यक्तिगत आणि कौटुंबिक समस्या इत्यादी कारणांमुळेशेतकरी आत्महत्या करतात.

**५) शेतमजुरीची समस्या :-**शेतमजूर आणि शेतमजुरी हा भारतीय शेती व्यवसायात अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. सांप्रत काळात भारतीय शेती व्यवसायात शेतकरी आणि त्याहीपेक्षा शेतमजुराची स्थिती दयनीय आहे. कारण शेतमजूर हा घटक सर्वाधिक मागासलेला आणि दुर्लक्षित आहे. शेतमजुराकडे निश्चित स्वरूपाचे उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे आणि त्याचे उत्पन्न देखील अत्यल्प असल्यामुळे तो महत्त्व प्रयासाने आपल्या कुटुंबाला दोन वेळचे जेवण देतो. शेतमजुराकडे इतर व्यवसायात काम करण्याचे कोणतेच कौशल्य नसल्यामुळे त्यांना शेतीतच मिळेल त्या मजुरीवर काम करावे लागते. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचे लोक मोठ्या प्रमाणात शेतमजुरीचे काम करतात. भारत सरकारने इसवी सन १९५१-५२ मध्ये पहिली शेतमजूर चौकशी समिती स्थापन केली. या समितीने "मजूर म्हणजे अशी व्यक्ती की, जी एका वर्षातील त्याच्या एकूण कामाच्या दिवसांपैकी अर्ध्याहून अधिक दिवस शेतात मजुर म्हणून काम करते. १९५६-५७ मधील दुसऱ्या कृषी कामगार समितीने "शेतमजूर ती व्यक्ती आहे की, जिच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन शेतीमधून प्राप्त होणारी मजुरी हे आहे." अशी शेतमजुराची व्याख्या केली आहे.

अशाप्रकारे जी व्यक्ती दुसऱ्याच्या शेतीवर एका कामगाराच्या स्वरूपात काम करते अथवा त्याच्या द्वारा संचालित इतर कोणत्या कृषी उद्योगांमध्ये एक कामगार म्हणून काम करते आणि तिला आपल्या श्रमाच्या मोबदल्यात काही नगदी रक्कम अथवा वस्तू दिली जाते. आज महागाई गगनाला भिडलेली आहे. अल्पमजुरीत स्वतःच्या आणि आपल्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील इतर सदस्यांच्या मूलभूत गरजा देखील भागविणे शेतमजुराला शक्य होत नाही. म्हणून तो जास्त मजुरीची मागणी करतो. परंतु शेतकऱ्याला मजुरास जास्त मजुरी देणे परवडेनासे झाले आहे. शेतकऱ्यासह समाजातील अनेक व्यक्ती शेतमजुराच्या वाढलेल्या मजुरी बद्दलच बोलतात. शेतमजुरी जास्त असणे हिच त्यांना प्रमुख समस्या वाटते. परंतु वाढलेली महागाई, शेतीच्या उत्पादन खर्चात मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, शेतीमालाला मिळणारा अत्यल्प भाव ह्या समस्यांकडे फारसे गांभीर्याने बघितले जात नाही.

**६) मद्यपान आणि व्यसनाधीनता :**देशातील बहुतांश शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अतिशय वाईट असली तरी सर्व शेतकरी आत्महत्या करत नाहीत.काही शेतकरी या परिस्थितीचे दुःख विसरण्यासाठी मद्यपान करतात. ग्रामीण भागात

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLVII) 457-A
ISSN : 2278-9308 February 2024

अत्यंत निकृष्ट प्रतिची गावठी दारू स्वस्त दरात उपलब्ध असते. ती शरीरास अपाय करते. नापिकी, अत्यंत निम्न आर्थिक दर्जा, कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे खचून गेलेले शेतकरी जुगार आणि इतर व्यसनांच्या आहारी जातात. ग्रामीण समाजात आज शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये देखील व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढलेले आहे. मद्यपानासोबतच विविध व्यसने केले जातात. शेतीकामाचाशीण घालवण्यासाठी मद्यपान केले जाते. जेव्हा अति प्रमाणात मद्यपान केले जाते तेव्हा त्याला मद्यविकाराचे स्वरूप प्राप्त होते. अतिप्रमाणात आणि प्रदीर्घकाळ मद्य सेवन करणे हा मद्यविकार या संज्ञेच्या अर्थाचा मुख्य भाग आहे."सातत्याने आणि अनिवार्य स्वरूपात मद्याचे सेवन करण्यामधून जडलेला मद्यविकार हा एक आजार आहे." ग्रामीण समाजात घरांचा आकार लहान असतो. एक किंवा दोन खोल्यांमध्ये चार ते सहा सदस्यांचे वास्तव्य असते. त्यामुळे वडीलधारी माणसं लहान मुलांसमोरच मद्यपान किंवा इतर व्यसन करतात. काही कुटुंबांमध्ये वडिलांकडून रिक्त झालेल्या दारूच्या बाटल्या विकून मिळालेल्या पैशातून मुले गुटखा तंबाखूचे सेवन करतात.

**७) दारिद्र्य निर्मूलन** :"एखाद्या जवळ काय आहे आणि काय असावयास पाहिजे यामध्ये तफावत दर्शविणारी स्थिती म्हणजे दारिद्र्य होय." बी हेनरी यांनी दारिद्र्याची ओळख करण्यासाठी चार निकष सांगितले आहेत. १) उपजीविकेसाठी संसाधनांचा अभाव २) पैसा-अडका जमीन-जुमला यासारख्या साधनसामग्रीचा अभाव. ३) असुरक्षिततेची व विफलतेची भावना. ४) साधनसामग्रीच्या अभावामुळे सामाजिक संबंध टिकवणे व विकसित करण्यामध्ये निर्माण झालेली असमर्थता.

भारतीय ग्रामीण समाज हा हलाखीचे जीवन जगत आहे. या समाजातील दारिद्र्याचे निर्मूलन करणे हे एक आव्हान आहे. कारण दारिद्र्य निर्मूलनाच्या विविध योजना राबवल्या तरी त्याबाबत मतभिन्नता व्यक्त होणे सुरूच असते. एखाद्याजवळ काय आहे आणि काय असावयास पाहिजे या अर्थाने दारिद्र्याचा विचार केल्यास दारिद्र्य हे कायमस्वरूपी निकाली निघणारे आव्हान नाही असे वाटते. कारण समाजातील संसाधनांचे वितरण विषम स्वरूपात झालेले असते म्हणून काही लोकांकडे संसाधने एकवटलेली असतात आणि काही लोक त्यापासून वंचित असतात. म्हणून ज्यांच्याकडे संसाधने आहेत त्यांच्या तुल नेत संसाधनांपासून वंचित असणारे लोक दरिद्री ठरतीलच. ग्रामीण समाजात शेतीचे वितरण विषम स्वरूपात झालेले आहे. युएनडीपी च्या अहवालानुसार २००५-०६ मध्ये, सुमारे ६४५ दशलक्ष लोक भारतातील बहुआयामी दारिद्र्यात होते, ही संख्या २०१५-१६ मध्ये सुमारे ३७० दशलक्ष आणि २०१९-२१ मध्ये २३० दशलक्ष इतकी घसरली. असे असले तरी प्रत्यक्षात दारिद्र्याची तीव्रता म्हणावी तशी ग्रामीण समाजात कमी झालेली नाही. सामाजिक दृष्टिकोनातून दारिद्र्य समजून घेताना वंचितता असमानता आणि तुलनात्मकता या तीन घटकांवर भर दिला जातो. संसाधनांच्या वितरणाबाबत विचार केल्यास ग्रामीण समाजाच्या वाट्याला त्यातही शेतमजुरांच्या वाट्याला अत्यल्प संसाधने आली आहेत. त्यामुळे ग्रामीण नागरी समाजाची तुलना केल्यास आणि शेतकरी शेतमजूर यांची तुलना केल्यास त्यांच्यामध्ये असमानता दिसून येते. ग्रामीण समाजातील ही असमानता कमी करणे वाटते तितके सोपे काम नाही.

**७) रोजगार** :भारतीय योजना आयोगाने "ज्या व्यक्तींना एका आठवड्यात एक दिवस कामाशिवाय राहावे लागते त्यांना बेरोजगार असे संबोधले आहे." भारतात लोकसंख्येचा विस्फोट झाला आहे. ग्रामीण समाजात शेती व्यवसायासाठी जास्त मनुष्यबळाची गरज असते. जितके शेतीत राबणारे हात जास्त असतील तितके उत्पन्न जास्त होईल असा समज आहे. शेतीचे तुकडीकरण झाल्यामुळे ग्रामीण भागात केवळ शेतीच्या भरवशावर सर्व लोकांना आठवड्यातील सर्व दिवस काम मिळणे शक्य नाही. शेती सोबतच इतर क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्याशिवाय ग्रामीण भागातील लोकांना आठवडाभर काम मिळू शकणार नाही. त्याकरिता महाराष्ट्र उद्योजकता विकास महामंडळाचे विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांसोबतच इतर उद्योग उभे राहणे आवश्यक आहे. परंतु शासन आणि मोठमोठे उद्योगपती औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहती मोठमोठ्या शहरांमध्ये उभारत आहे. शेत जमिनीवरील भार कमी करून मध्यम उद्योग, कुटीर उद्योग, लघुउद्योग, आणि ग्राम उद्योगांना प्रोत्साहन द्यावे लागेल. अन्यथा ग्रामीण भागात रोजगाराचे आव्हान निर्माण झाले आहे.

**८) राहणीमानाचा दर्जा उंचावणे** :ग्रामीण समाजातील लोकांचा राहणीमानाचा दर्जा निम्न स्वरूपाचा आहे. तसेच भारतात मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता आहे. म्हणून राहणीमानाचा दर्जा राज्यपरत्वे आणि भौगोलिक प्रदेशानुसार बदलत असतो. भारतात एकीकडे बहुतेक महानगरे, शहरे आणि उपनगरांमध्ये जागतिक दर्जाची रुग्णालये, आलिशान हॉटेल्स, क्रीडा सुविधा आणि विकसित राष्ट्रांप्रमाणेच मनोरंजनाची साधने उपलब्ध आहेत, तर भारताच्या ग्रामीण

भागात प्रचंड दारिद्र्य आहे, जेथे अत्यंत मूलभूत अशी वैद्यकीय सेवा उपलब्ध नाही. लोकांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. लोकांना पोटभर अन्न मिळत नाही. ग्रामीण लोक आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता देखील करू शकत नाही. जगातील दहा श्रीमंतांच्या यादीमध्ये भारतातील श्रीमंत लोकांचा समावेश आहे. म्हणून भारताला श्रीमंत लोकांचा गरीब देश असे संबोधले जाते. मोठ्या प्रमाणात दारिद्र्य आणि आर्थिक विषमता असल्यामुळे राहणीमानाचा दर्जा उंचावणे हे ग्रामीण समाजासमोरील एक आव्हान आहे.

**९) शेतीचे तुकडीकरण :**ग्रामीण समाज हा शेती आणि शेतीशी निगडित उद्योग धंद्यावर आधारित आहे. भारतात लोकसंख्या वाढ झपाट्याने होत आहे. वारसा हक्क कायद्याने वडिलोपार्जित संपत्ती मध्ये मुला मुलींना हक्क प्राप्त होतो. त्यामुळे जमिनीचे छोट्या छोट्या तुकड्यांमध्ये विभाजन होत आहे. परिणामी अल्प शेतीमध्ये शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित नवीन प्रयोग करणे अशक्य झाले आहे तसेच शासनाच्या योजना अत्यल्पभूधारकांना घेता येत नाही. म्हणून शेतीचे विभाजन थांबवून शेतीसंबंधी शासकीय योजना पदरात पाडून घेणे आणि आर्थिक विकास साध्य करून घेणे हे ग्रामीण समाजासमोरील एक आव्हान आहे.

**१०) सिंचन आणि विजेचे आव्हान :**शेतकऱ्यांकडे सिंचनाच्या साधनांचा अभाव आहे. काही शेतकऱ्यांकडे सिंचनाची सोय आहे तसेच सिंचनासाठी लागणारी साधने देखील उपलब्ध आहेत. तरी ग्रामीण भागात विजेचा तुटवडा असतो. शेतीची ओलिताची कामे दिवसा सूर्यप्रकाशात करावी लागतात. परंतु शेतकऱ्यांना स्वतःचा जीव धोक्यात घालून रात्रपाळी मध्ये पिकाला सिंचन करावे लागते. रात्री वेळी अवेळी जाऊन शेतात राववे लागते. शेतीला सिंचन न करता आल्यामुळे आणि शेती नैसर्गिक पावसावर अवलंबून असल्यामुळे शेतकऱ्याला हवे तसे उत्पादन शेतीतून करता येत नाही. त्यामुळे त्याच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत नाही. म्हणून तोकड्या साधनांच्या आधारे आणि कमी प्रमाणात विजेच्या उपलब्धतेमध्ये शेतीला सिंचन करणे हे एक ग्रामीण भागातील फार मोठे आव्हान आहे.

**निष्कर्ष**

आजही भारतातील ६८ टक्के लोकसंख्या शेती व शेतीशी निगडित व्यवसायावर आधारित आहे. ६५% लोक ग्रामीण भागात राहतात. म्हणून भारताच्या विकासाचा विचार करताना खेड्याला केंद्रबिंदू मानून विचार करण्यात यावा. कारण भारत हा खेड्यांचा देश आहे. भारतात १९५० पासून सामुदायिक विकास कार्यक्रम, राष्ट्रीय विस्तार सेवा, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, स्वर्ण जयंती ग्रामीण रोजगार योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, प्रधानमंत्री ग्रामोदय योजना, इंदिरा आवास योजना अशा विविध ग्रामीण विकासाच्या योजना राबवल्या जात आहेत. विकासाचे नवे नवे प्रकल्प उभारले जात आहेत. असे असले तरी ग्रामीण समाजाचा हवा तसा विकास झालेला नाही. नागरी समाजाशी तुलना करता ग्रामीण समाज अभावग्रस्त आणि समस्याग्रस्त जीवन जगत आहे. शेती उत्पादनात वाढ झाली असली तरी शेतीतून येणाऱ्या उत्पादनाचा खर्च देखील मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. ग्रामीण समाजात सिंचनाची साधने कमी प्रमाणात उपलब्ध आहेत उपलब्ध असले तरी वीजपुरवठा अखंडपणे होत नाही. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना आपली जमीन ओलिताखाली आणता येत नाही. म्हणून त्यांच्या उत्पन्नात घट होते. भारतात सकल राष्ट्रीय उत्पन्नापैकी ५० टक्के उत्पन्न शेतीतून मिळत असले तरी शेतकऱ्यांना आणि शेतमजुरांना अत्यंत दयनीय अवस्थेत जीवन जगावे लागत आहे. देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढले असले तरी दरडोई उत्पन्न त्या प्रमाणात वाढलेले नाही. म्हणून आजही ग्रामीण समाजाला बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, महिला सक्षमीकरण, शेतकरी आत्महत्या, स्थलांतर, शेतमजुरी, दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती, राहणीमानाचा दर्जा उंचावणे, शेतीचे तुकडीकरण, सिंचनाची साधने विजेचा पुरवठा अशा विविध समस्या आणि आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. या समस्या आणि आव्हानांना निकाली काढल्याशिवाय ग्रामीण समाजाचा विकास शक्य नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) आगलावे डॉ. प्रदीप व आगलावे डॉ. सरोज, भारतातील सामाजिक समस्या, साईनाथ प्रकाशन नागपूर, प्र.आ. जुलै २०१८

२) लोटे रा. ज., ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, पिंपळापुरे अँड पब्लिशर्स नागपूर २००२

३) नाडगोंडे डॉ. गुरुनाथ, ग्रामीण समाजशास्त्र कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, २००२

४) राम आहुजा, सामाजिक समस्याएं, रावत पब्लिकेशन जयपुर, २०१८.

५) लोटे रा. ज. व चव्हाण डॉ. ए. डी., भारतातील सामाजिक समस्या, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर, जून २०१८

६) सिंह शिवबहाल, विकास का समाजशास्त्र, रावत पब्लिकेशन जयपुर, २०१८

७) आगलावे डॉ. प्रदीप, भारतीय समाज संरचना आणि समस्या, साईनाथ प्रकाशन नागपूर, २००३

८)https://www.hindustantimes.com/india-news/india-poverty-levels-415-million-15-years-united-nations-101689054752864.html